# पुणे विद्यापीठ

## दरपत्रक सूचना

जा.क्र./स्थावर/दरपत्रक/२०१४–१५/146 दि. ०७/०५/२०१४

पुणे विद्यापीठ परिसरातील खालील कामांकरीता सार्वजनिक बांधकाम, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम अथवा इतर शासकीय/निमशासकीय संस्थेतील योग्य श्रेणीतील नोंदणीकृत विद्युत ठेकेदारांकडून बी –१ नमुन्यात मोहारबंद (दोन लिफाफा पद्धतीने) दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजे रक्कम रु. | काम पूर्ण करण्याचा कालावधी | अनामत रक्कम (EMD) | को–या दर पत्रकाची किंमत रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे विद्यापीठातील शिक्षक निवास M इमारतीचे अंतर्गत विदयूतीकरणाचे दुरुस्तीचे काम करणे. | ४,८७,६२८/– | ९ महिने | ५०००/– | ५००/– |
| २ | पुणे विद्यापीठातील शिक्षक निवास L इमारतीचे अंतर्गत विदयूतीकरणाचे दुरुस्तीचे काम करणे. | ४,८१,९५८/– | ९ महिने | ५०००/– | ५००/– |
| ३ | पुणे विद्यापीठातील शिक्षक निवास O इमारतीचे अंतर्गत विदयूतीकरणाचे दुरुस्तीचे काम करणे. | ४,९३,२९८/– | ९ महिने | ५०००/– | ५००/– |
| ४ | पुणे विद्यापीठाच्या आवारातील एच. टी. विदयूत वाहिन्या, सबस्टेशन, ट्रान्सफॉर्मर्स, डि. बी. व फिडर पिलर इ. कामाचे परिरक्षण व दुरुस्ती सह वार्षिक देखभाल करणे. | ३,६१,८१९/– | १२ महिने | ४०००/– | ५००/– |

<u>अटी व शर्ती</u>

१. को--या दरपत्रक संचाची किंमत (विना परतावा) डिमांड ड्रॉप्टने मा. कुलसचिव पुणे विद्यापीठ, पुणे--७ यांचे नावाने भरावा लागेल.

२. को--या दरपत्रकाकरीता योग्य श्रेणीतील विद्युत नोंदणीकृत व विद्युत परवानाधारक ठेकेदारांनीच अर्ज करावेत. अर्जा सोबत नोदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच ठेकेदारास कोरे दरपत्रक संच देण्यात येईल. कोरी दरपत्रके कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात दि. ०७/०५/२०१४ पासून ते दि. १५/०५/२०१४ पर्यंत कार्यालयीन वेळेत मिळतील.

३. मोहरबंद दरपत्रके स्वीकारण्याची अंतिम तारीख १६/०५/२०१४ असून मोहोरबंद दरपत्रके कार्यालयीन वेळेत कार्यकारी अभियंता, स्थावर विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे – ७. यांच्या कार्यालयात दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्वीकारली जातील.

४. लिफाफा क्र.१ मध्ये ठेकेदाराचे पत्र, अनामत रक्कमेचा धनाकर्ष, विद्युत परवाना प्रमाणपत्र व नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत व दरपत्रकात नमुद केल्याप्रमाणे अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. अन्यथा लिफाफा क्र. २ उघडण्यात येणार नाही. लिफाफा क्र. २ मध्ये पुरविण्यात आलेले दरपत्रक ठेकेदाराने स्वत:च्या हस्ताक्षरात भरणे आवश्यक आहे तसेच स्वाक्षरी करणे अनिवार्य आहे. अन्यथा दरपत्रक रद्द करण्यात येईल.

५. प्राप्त झालेली मोहोरबंद दरपत्रके (लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र. २) दि. १६/०५/२०१४ रोजी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येईल. (शक्य झाल्यास)

६. लिफाफ्यावर कामाचे नाव, दरपत्रक क्रमांक तसेच ठेकेदाराचे नाव असणे आवश्यक आहे.

७. अटी व शर्ती असलेली दरपत्रके मंजूर करण्यात येणार नाही.

८. दरपत्रकातील अटी व शर्ती तसेच इतर माहिती कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध असेल.

९. सविस्तर दरपत्रक सुचना पुणे विद्यापीठाच्या संकेत स्थळ <u>www.unipune.ac.in</u> वर सुद्धा उपलब्ध आहे.

कार्यकारी अभियंता
पुणे विद्यापीठ, पुणे-०७.

**प्रत माहितीसाठी :**

१ स्थावर विभाग-- नोटीसबोर्ड
२ प्रशासन विभाग-- नोटीसबोर्ड
३ विभाग प्रमुख, सी.आय.एन.एस.--इंटरनेट प्रसिध्दीसाठी